केसरी पुणे, २७ एप्रिल २०१८

# हुतात्मा राजगुरू विद्यालयात उन्हाळी शिबिराचे आयोजन



**पुणे :** पंख आणि क्विकहील फाऊंडेशनच्या शाळांगण प्रकल्पाअंतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू विद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी उन्हाळी नाट्यशिबिर आयोजित करण्यात आले. याप्रसंगी पंख संस्था प्रमुख सौ. स्मिता आपटे, क्विक हिल फाऊंडेशनचे सी.एस.आर. प्रमुख अजय शिर्के, अभिनेते श्रीकांत यादव, शुभंकर एकबोटे आणि दिग्दर्शक बॉबी उपस्थित होते. तसेच राजगुरू यादव व एकबोटे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी नृत्य व नाटक सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. राजा दगडे, पायल जाधव, अनघा हरकरे, अनिकेत साठे यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा शेटे व राजगुरू गर्ल्स विद्यालयाच्या पाटील यांचे सहकार्य लाभले.